खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

# लेख १०) पाखरं - संध्या रंगारी

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

SANJAY MARHRM

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# लेख १०) पाखरं - संध्या रंगारी

## लेखिका परिचय :

**जन्म लातूरचा. महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका. लेखिका दहावीत असताना 'आघात' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला.** त्यानंतर त्यांचे 'कवडसे', 'संध्यारंग', 'वाताहततीची कैफियत' (कवितासंग्रह), **'चांदणचूरा' (ललित गद्य)** 'कयाधू खोऱ्यातील लोकसाहित्य' (संपादन) हे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

**'पाखरं' हा संध्या रंगारी यांचा ललितलेख आहे. या लेखातून भटकंती करणाऱ्या, पालावर जगणाऱ्या, शिक्षणाची परवड झालेल्या 'भारत' नावाच्या एका फासेपारधी मुलाचे विश्व साकार झाले आहे.**

या लेखाची सुरूवात काव्यमय पध्दतीने झाली आहे.... 'झाडं नसतात कधीच एकटी, एकाकी, त्यांच्यासोबत असतो चिमण्या पिलांचा किलबिलाट... फांदी-फांदीवर असतात पाखरांचे थवे... पाना-पानांच्या रेषेत असतात त्यांनी कोरलेली गाणी... झाडांनाच कळत असतं पाखरांचं खरं दुःख...पण झाड मात्र उभं असतं... शांत....स्तब्ध एखाद्या सात्विक साधुपुरुषासारखं...

कळत नाही - ही पाखरं तरी कशाला घरटी बांधत असतील. सामर्थ्य आहे... उडण्याचं वेड आहे... हे निळं आभाळ कवेत घेण्याची इच्छा आहे. पंखात बळ आहे... तरीही मन मात्र गुंतलेलं... झाडात... झाडावरच्या घरट्यात...घरट्यातल्या पिलात... असे कसे हे ऋणानुबंध !

एक-एक काडी गोळा करून घरटं बांधायचं...पिल्लांच्या चोचीत दाणे भरवायचे...त्यांना जपायचं... हळूहळू ती मोठी होणार... त्यांच्या पंखात ताकद येणार... अन् ती उडू लागणार...या फांदीवरून त्या फांदीवर... या झाडावरून त्या झाडावर... उंच उंच आभाळात...आणि एक दिवस... दूर... खूप दूर दूर... अगदी कायमचीच..., कसं सहन

SANJAY MAR HRM

करायचं हे...! पण... झाड मात्र आपलं उभचं... शांत...स्तब्ध एखाद्या स्थितप्रज्ञासारखं. वरीलप्रमाणे झालेली लेखाची सुरुवात पाखरं, झाडं यांचे जीवनविश्व प्रकट करणारी आहे.

**लेखिकेला पाखरांचे वेड आहे. उडती पाखरं पाहताना त्यांना आनंद होतो.** गावात पारधी लोकांची पालं पडलेली आहेत. पारध्यांमुळे निष्पाप पाखरांचा जीव जातो, म्हणून त्या दुःखी होतात. या विचारात माळ उतरत असताना त्यांना एक **पारध्याचं पोरगं दिसतं**. मास्तरीन असल्याचं कळल्यावर ते घाबरतं. शाळेत का जात नाही ? या प्रश्नाचे उत्तर देताना...

**" साळत गेल्यानं माणूस येडा होतो - राघुवानी"**

लेखिकेला मात्र त्याच्या उत्तराचं नवल वाटतं.

**"बाई, पालिटिक्स म्हंजी काय?"** असा तो प्रश्न विचारतो...

तो म्हणतो, **आमच्या पालावर सरपंच, तलाठी येऊन पैशाच्या बदल्यात आमच्या आईवडिलांचे अंगठे कोणत्यातरी कागदावर घेतात. पण तो राघू म्हणतो, हे पॉलिटिक्स आहे...त्याला मात्र सगळे वेडा म्हणतात.**

लेखिका म्हणते, मी पेचात पडले. कसं सांगू पॉलिटिक्स म्हणजे काय ?

**"अरे लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी लोकांकडून चालविलेले राज्य."**

**तो म्हणाला, छया, ...कंच्या युगात वावरताईसा बाई तुम्ही ?"**

**तो म्हणतो, चला, मी तुम्हाला पॉलिटिक्स दाखवतो.**

"बघा बाई ! मी पाहते तो काय, त्यांच्यापैकी कोणीतरी जाळं लावलं होतं. आमिष म्हणून काही दाणे टाकले होते. बिचारी निष्कपटी, निष्कलंक पाखरं आली... चोचीनं दाणे टिपू लागली, टिपता टिपताच अडकली... अडकल्याची जाणीव होताच बाहेर पडण्यासाठी धडपडू लागली... पण व्यर्थ... मी डोळे विस्फारून पहातच राहिले.... थोड्या वेळाने शिकारी आला. त्याने एक करून त्या जाळ्यातून पाखरांना बाहेर काढलं. त्यांचे पंख छाटले... पिंज-यात डांबलं.... बाजारात आणलं... लिलाव मांडला... बिचारी पाखरं... धडपडली... घायाळ झाली... कावरीबावरी होऊन आभाळाकडे पाहू लागली... आपलं छत्र शोधू लागली...



SANJAY MAR HRM

**तो म्हणाला, बाई, राघू मनतो, हेलाच मंत्यात पालिटिक्स."**

**तो म्हणतो, बाई, आमची अवस्था पाखरासारखी झाली. त्या राघूला सरपंचाच्या माणसांनी मारून टाकला. "आपलीच माणसं अशी आपलीच माती करत्यात बगा" कशी जगत्याल पाखरं ?**

**लेखिका अस्वस्थ होते... उदध्वस्त...**

लेखिकेने त्याला नाव विचारलं.

**"भारत, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालं, हे जवा माज्या मायबापास्नी कळलं ना तवा त्यायला लय मोठा आनंद झाला. अन् त्यांनी माझं नाव ठेवलं भारत."**

**"बाई, स्वातंत्र्य मंजी काय?"**

**कसं सांगू? मला स्वातंत्र्याचा अर्थ विचारणारा भारत अजूनही पारतंत्र्यात होता. तेवढ्यात, 'भारत्या चल... लई पाखरं गावल्यानी' अशी हाका मारत एक बाई आली. भारत्या तिच्यासोबत गेला.**

सांज झाली. सुगरणीच्या खोप्यातील पिलं सारखी माना बाहेर काढून आईचा शोध घेऊ लागली. त्यांची आई अजूनही आली नव्हती. येणारही नव्हती. ती तर त्या जाळ्यात.... कसं सांगू या पिलांना हे ?

**लेखिकेने झाडाकडे पाहिलं. झाड मात्र आपलं उभचं होतं.... शांत.... स्तब्ध एखाद्या सात्त्विक साधूपुरुषासारखं.... स्थितप्रज्ञ !**

## या लेखाचे विशेष :

**'पाखरं' या संध्या रंगारी यांच्या लेखातून भटकंती करणाऱ्या, पालावर जगणाऱ्या आणि शिक्षणाची परवड झालेल्या भारत नावाच्या एका फासेपारधी मुलाचे विश्व साकार झाले आहे. भारत हा पाखरे पकडणाऱ्या जाळ्याचे दृश्य दाखवतो. हे प्रतीकात्मक दृश्य, भारतचे अकाली प्रौढत्व, त्याची पॉलिटिक्सची व्याख्या, राघुचा बळी, पुतळ्यांचे राजकारण अशा सगळ्यातून फासेपारध्यांच्या वेदनादायी जीवनाचा प्रत्यय येतो. भटक्या वंचित जमातीचे दु:ख आणि वेदनादायी जीवनानुभवाचा प्रत्यय या**



SANJAY MAR HRM

**लेखातून येतो. चित्रदर्शी अनुभवकथन आणि समाजातील एक प्रखर राजकीय वास्तव या लेखात तरलतेने अभिव्यक्त झाले आहे.**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे ,**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM